**मूल्यांकन** • जेसीआयची मान्यता; उत्कृष्टतेसाठी जागतिक स्तरावर मान्यताकृत मापदंड

# 'लीलावती'ला गोल्ड सील ऑफ अप्रूव्हल

▶ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. लिलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर (एलएचआरसी)ला प्रतिष्ठित जॉइण्ट कमिशन इंटरनॅशनल (जेसीआय) गोल्ड सील ऑफ अप्रूव्हल® मिळाले आहे. ही मान्यता रूग्णांची सुरक्षा, वैद्यकीय केअर आणि संस्थात्मक व्यवस्थापनामधील उत्कृष्टतेसाठी जागतिक स्तरावर मान्यताकृत मापदंड आहे. ८ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत तीन आंतरराष्ट्रीय सर्वेक्षकांद्वारे मूल्यांकन करण्यात आल्यानंतर मिळालेल्या या मान्यतेसह एलएचआरसी जगभरातील निवडक हॉस्पिटल्समध्ये सामील झाले आहे, जे आरोग्यसेवेच्या उच्च मानकांचे पालन करतात. जेसीआय मान्यता हॉस्पिटलची रूग्ण-केंद्रित केअरसेवा,



वैद्यकीय उत्कृष्टता, सतत दर्जामध्ये सुधारणा आणि कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण याप्रती कटिबद्धतेची पुष्टी देते. या मूल्यांकनामध्ये दर्जेदार केअर सेवेची उपलब्धता, शस्त्रक्रियेदरम्यान सुरक्षितता, औषधोपचार व्यवस्थापन, संसर्गावर नियंत्रण, प्रशासन, सुविधा व्यवस्थापन आणि दर्जावर देखरेख अशा महत्त्वपूर्ण क्षेत्रांचा समावेश होता.

> "जेसीआय मान्यतेसह एलएचआरसी भारतातील आरोग्यसेवा क्षेत्रासाठी मापदंड स्थापित करत आहे, तसेच प्रत्येक रूग्णाला उच्च दर्जाची केअर सेवा मिळण्याची खात्री घेत आहे. या मान्यतेसह एलएचआरसी प्रतिष्ठित समूहामध्ये सामील झाली आहे, जे प्रखर आंतरराष्ट्रीय मापदंडांचे पालन करतात आणि या संस्थांना जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवाचे विश्वसनीय प्रदाते म्हणून स्थापित करतात.
>
> –राजीव मेहता लिलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे कायमस्वरूपी विश्वस्त

## विश्वास, नाविन्यता व उत्कृष्टतेचे प्रतीक

जेसीआयचे गोल्ड सील ऑफ अप्रूव्हल जागतिक स्तरावर मान्यताकृत मापदंड आहे, जी आरोग्यसेवा उद्योगामधील सर्वसमावेशक मूल्यांकन प्रक्रियेला सादर करते. ही मान्यता मिळणे म्हणजे हॉस्पिटलला स्पर्धात्मक फायदा मिळतो, विमा कंपन्या व व्यावसायिक संस्थांकडून मान्यता अधिक पक्की होते आणि संस्थेला आपल्या कामगिरीमध्ये सुधारणा करण्यासाठी योग्य धोरण तयार करण्यास मदत होते. तसेच, ही मान्यता आरोग्यसेवा संस्थांना उच्च-विश्वसनीय संस्थांमध्ये विकसित होण्यास, कर्मचाऱ्यांना अधिक प्रशिक्षण देण्यास आणि दर्जा व रूग्णांच्या सुरक्षिततेमध्ये आघाडीच्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळवून देण्यास देखील साह्य करते. जेसीआय मान्यता म्हणजे हॉस्पिटलची सुरक्षित, गुणकारी व दयाळू केअर सेवा देण्याप्रती अविरत समर्पितता दिसून येते. जागतिक स्तरावर झपाट्याने वाढत असलेल्या आरोग्यसेवा क्षेत्रात जेसीआय-मान्यताकृत हॉस्पिटल्स विश्वास, नाविन्यता व उत्कृष्टतेचे प्रतीक मानले जातात.